## प्रतिज्ञापत्र

'राम गोसावी यांच्या कवितेचे विशेष' ("डोळे" व "अंधारबन" च्या आधारे) या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विदयापीठाच्या एम.फिल.च्या पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे. ही प्रबंधिका अथवा तिचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

बावधन

दिनांक : २२-१२-९४

कु. शोभा बाळकृष्ण गोरे.

(अभ्यासक.)

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कु. शोभा बाळकृष्ण गोरे, यांनी शिवाजी विदयापीठाच्या एम.फिल. या पदवीसाठी सादर केलेल्या, 'राम गोसावी यांच्या कवितेचे विशेष' ("डोळे" व "अंधारबन" च्या आधारे) या प्रबंधिकेसाठी केलेले सर्व संशोधन माझ्या मार्गदर्शनाखाली झालेले आहे. प्रबंधिका लेखनात ज्या संदर्भ साहित्याचा आधार घेण्यात आलेला आहे, त्यांचा आवश्यक तेथे यथोचित निर्देश केला आहे. परिशिष्टात आवश्यक त्या साधनांची सूची दिलेली आहे.

कु. शोभा बाळकृष्ण गोरे यांनी ही प्रबंधिका स्वतंत्रीरित्या लिहिली असून, ती इतर कोणत्याही विदयापीठातील कुठल्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेली नाही.

सदर प्रबंधिका शिवाजी विदयापीठाच्या मराठी विषयावरील एम.फिल. पदवीसाठी सादर करण्यात माझी अनुमती आहे.

वाई

दिनांक : २२/१२/८४

( डॉ. शिवाजीराव रा. चव्हाण )

मार्गदर्शक.

प्राध्यापक, विभागप्रमुख

मराठी विभाग व मराठी संशोधन केंद्र

किसन वीर महाविद्यालय वाई (सातारा)

## ऋणनिर्देश

स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेत दलित आणि ग्रामीण कविताचे नवे प्रवाह सामर्थ्याने वाहताना दिसतात. तरीही भावकविता क्षीण झालेली नाही. आधुनिक मराठी कवितेचे अंत:प्रवाहही तितकेच समर्थपणे वाहताना आढळतात. केशवसुतांनी सुरू केलेल्या आधुनिक भावकवितेच्या प्रवाहातील कवितेकडे पाठ फिरविणे व विद्रोहाचे कौतुक करणे अशी एक प्रथाच पडून गेलेली दिसते. मराठी रसिकांच्या आवडीनिवडी व त्यामुळे मराठी साहित्य समृद्ध होत आहे.

राम गोसावी यांचे जीवन अकाली आलेल्या अंधत्वामुळे शोकाकुल बनले आहे. त्यांच्या कवितेला दाटलेला अंधार त्यांच्या व्यक्तिमत्वाचा स्थायीभाव बनला आहे. याची जाणीव त्यांच्या कविता वाचत असताना मला झाली. कवी राम गोसावी यांची कविता सृष्टी १९४५ सालापासून फुलत असली तरी तिला ख-या अर्थाने बहर आला तो १९६० नंतर १९६५ पर्यंत त्यांच्या व्यक्तिमत्वाचा तो अविष्कार कवितेत विविधरंगी दिसतो. त्यामुळे त्यांनी सामाजिक, राजकीय, निसर्ग, प्रेमविषयक इ. प्रवृत्ती तिच्यात आणल्या. मात्र अंधत्व आल्यानंतर त्यांच्या या जाणीवांना काळवंडलेले स्वरुप आले आहे. ते आपले अपार दु:ख बाजूला सारुन कवितांचा आधार घेतात. हीच कविता त्यांची आंधळ्याची काठी आहे. त्यामुळे ते उत्साही जीवन जगतात.

सगळे जग डोळ्यांनी पाहण्याची त्यांच्या मनाची कोंडी झाली आहे. ही कोंडी त्यांच्या मनाला लसून राहिलेली असूनही ही कविता काळोखातून प्रकाशाकडे वाटचाल करते आहे. ही त्यांच्या कवितेची जमेची बाजू असून तिचे स्वरुप न्याहाळावे असे वाटल्यावरुन मी कवी राम गोसावी यांच्या कवितांवर शोधनिबंध लिहायचा विचार केला याचा मला आनंद होतो. अंधारमय जीवनाची शोकांतिका त्यांनी आपल्या कवितांतून समर्थपणे उभी केली आहे. या माझ्या जाणीवेमुळे एम.फिल. पदवीसाठी

मी राम गोसावी यांच्या कवितेचे विशेष ("डोळे" व "अंधारबन" यांच्या आधारे) या विषयावर प्रबंधिका लिहण्यासाठी प्रवृत्त झाले.

या माझ्या संशोधनकार्यासाठी मला अभ्यासूवृत्तीने व तळमळीने मार्गदर्शन करणारे डॉ. शिवाजीराव चव्हाण यांनी मराठी कवितासृष्टीचा नवा विचार मांडण्यासाठी, माझ्या इच्छेप्रमाणे प्रबंधिका लिहिण्यासाठी मला मार्गदर्शन करण्याचे मान्य केले. संशोधनपर प्रबंधिका लेखनासाठी आवश्यक असणा-या तंत्रज्ञानाबरोबरच माझ्या संशोधन विषयासाठी कोण-कोणत्या गोष्टींचा अभ्यास केला पाहिजे, विषय कसा मांडला पाहिजे, या सर्व गोष्टी आस्थेवाईकपणे समजावून दिल्या. आवश्यक तेवढे साधन-ग्रंथही सुचविले व शक्य तेवढे उपलब्ध करुन दिले. त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल मी सदैव त्यांची ऋणी आहे. त्यांच्या ऋणात राहण्यातच मला आनंद आहे.

माझ्या या संशोधनातून मला अभ्यासाची दिशा स्पष्ट झाली म्हणून या कामी अत्यंत सूक्ष्म पध्दतीने या एम.फिल. च्या प्रबंधिकेची साधनसंपत्ती गोळा केली. त्याकामी मला किसन वीर महाविद्यालयातील मराठी विभागातील प्रा.डॉ. पंडित टापरे, डॉ.सौ.नीलम हातेकर, प्रा.राम वाळके, प्रा.मच्छिंद्रनाथ हिंगसे, सौ.अनुराधा कुलकर्णी, यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आनंदराव कदम आणि ग्रंथपाल श्री.श.ना.हाळळ, श्री.तुकाराम मांढरे तसेच मराठी विभागातील विद्यार्थी संजय साळुंखे, सौ.मीनल साबळे, कु.वैशाली धाडगे, कु.अमोल घोरपडे यांनीही जे सहकार्य केले ते ही महत्वाचे मानते.

माझे पिताजी श्री.बाळकृष्ण गोरे आणि मातोश्री.सौ.लिला गोरे यांचे आशिर्वाद आणि प्रोत्साहन ही माझी अक्षय शिदोरी आहे. शिवाय मला या कामी सतत चेतना देणारे माझे पितृतुल्य ज्येष्ठ मेव्हुणे श्री.लक्ष्मणराव बाबासाहेब भोसले आणि ज्येष्ठ बहिण सौ. कमल लक्ष्मण भोसले या उभयता दोघांचा वाटा तितकाच मोलाचा आहे. शिवाय माझे दुसरे मेव्हुणे श्री.चंद्रकांत घोरपडे, श्री.संजय यादव, बहिण श्रीमती भारती यादव यांनीही या कामी मला वेळोवेळी सहकार्य केले. तसेच कुटूंबातील सर्वांचेच पाठबळ मला मिळाले. या सर्वांची मी शतशः ऋणी आहे.

ही प्रबंधिका वेळेत, सुबक व तत्परतेने टंकलेखन करुन दिलेले श्री· गणेश टाईपरायटिंग इन्स्टिटयुट, वाई चे प्राचार्य – श्री·सूर्यकांत दत्तात्रय जोशी व त्यांचे सहकारी कु· होमणे छाया सितारा व बांधणीकार व सजावट करुन देणारे यांचीही मी ऋणी आहे·

Goeesh

बावधन

कु· शोभा बाळकृष्ण गोरे·

दिनांक : २२-१२-९४

(अभ्यासक·)